वाचा :- १. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
२. साथ रोग अधिनियम, १८९७

---

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
क्र. कक्ष/ १०९ /२०२०
पुणे दिनांक १४ /०३/२०२०

जिल्हाधिकारी पुणे

आदेश

ज्या अर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ [अ] नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्या अर्थी, आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना विषाणू संसर्ग बाधित रूग्ण आढळत आहे. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरून व देशांतर्गत विमान प्रवासाद्वारे प्रवासी भारतात व इतरत्र प्रवास करीत आहे. त्यामुळे कोरोना विषाणूचे संशयित रूग्ण पुणे शहरातही आढळून आल्याचे निदर्शनास आलेले आहे. परदेश दौऱ्यावरून आलेल्या नागरिकांसाठी विलगीकरण कक्ष स्थापन करणे व त्यामध्ये १४ दिवसांसाठी खालील सूचनांचे पालन आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये पालन करणे या आदेशान्वये अनिवार्य करणेत येत आहे.

## घरात विलगीकरण कक्ष करण्याची सूचना

घरात विलगीकरण केलेल्या व्यक्तीने हवेशीर आणि वेगळी खोली ज्याला संडास बाथरूम जोडलेले आहे अशा खोलीमध्ये रहावे. जवळचे नातेवाईक जर त्या खोलीमध्ये राहणार असेल तर त्यांनी रूग्णापासून कमीत कमी एक मिटर अंतरावर रहावे.

- परदेश दौऱ्यावरून आलेल्या नागरिकांनी स्वत:हून शासकीय आरोग्य यंत्रणेस संपर्क साधून माहिती कळविणे बंधनकारक आहे.
- परदेश दौऱ्यावरून आलेनंतर १४ दिवस १०४ क्रमांकावर स्वत:ची आरोग्य विषयक माहिती कळविणे बंधनकारक राहील.
- त्यामध्ये कोरोना सदृश आजाराची प्राथमिक लक्षणे आढळल्यास स्वत:हून नजीकच्या शासकीय रूग्णालयामध्ये तपासणी करावी व आवश्यकतेनुसार भरती व्हावे.
- अशा व्यक्तीने घरातील वृध्द, गर्भवती स्त्री, लहान मुले व प्रतिकार शक्ती कमी असलेल्या व्यक्तींच्या संपर्कात येऊ नये.
- अशा व्यक्तीने घरातील त्यांचा वावर सिमीत ठेवावा.

- अशा व्यक्तीने कोणत्याही परिस्थितीत सामाजिक किंवा धार्मिक कार्यक्रम ठिकाणी जाणे कटाक्षाने टाळावे.
- अशा व्यक्तींनी त्यांचे पूर्व नियोजीत सभा, न्यायालयीन कामकाज इ. बाबत वेळीच संबंधित प्राधिकारी यांना कळवून सदर सभांना न्यायालयीन कामकाजांना गैरहजर राहणार असल्याची पूर्व परवानगी घ्यावी.
- अशा व्यक्तीने अल्कोहलयुक्त हॅण्ड सॅनीटायझर किंवा साबण आणि पाण्याने वारंवार व्यवस्थित हात धुवावेत.
- अशा व्यक्तीने वापरलेले ताट, वापरलेले पाण्याचे ग्लास, कप, जेवणाची भांडी, टॉवेल, पांघरूण, गादी आणि इतर दैनंदिन वापरातील घरघुती वस्तु घरातील इतर व्यक्तींना वापरण्यास देऊ नये.
- अशा व्यक्तींनी पूर्ण वेळ सर्जीकल मास्कचा वापर करावा. मास्क दर ६ ते ८ तासांनी बदलावा आणि वापरलेल्या मास्कची योग्यप्रकारे विल्हेवाट लावावी . डिस्पोजेबल मास्क पुन्हा वापरू नयेत.
- अशा व्यक्तींनी / त्यांची सुश्रुषा करणाऱ्या व्यक्तीने / निकट सहवासीतांनी घरातील सुश्रूषे दरम्यान वापरलेले मास्क ५ टक्के ब्लिच सोल्यूशन किंवा १ टक्के सोडीयम हायपोक्लोराईट द्रावणामध्ये निर्जंतुक करून त्याची जाळून विल्हेवाट लावण्यात यावी.
- वापरलेला मास्क हा जंतुसंसर्ग युक्त समजावा.

## घरी विलगीकरण केलेल्या कोरोना ग्रस्त रूग्णाच्या नातेवाईकांसाठी सूचना

- एकाच नातेवाईकाने अशा व्यक्तीची सुश्रुषा करावी.
- अशा व्यक्तींच्या शरीराशी थेट संपर्क येणे टाळावे आणि त्यांचे वापरलेले कपडे झटकू नये.
- घरातील विलगीकरण कक्षाची स्वच्छता करताना किंवा अशा व्यक्तींचे वापरलेले कपडे हाताळताना डिस्पोजेबल ग्लोव्हजचा वापर करावा.
- डिस्पोजेबल ग्लोव्हज काढल्यानंतर हात स्वच्छ धुवावेत.
- नातेवाईक आणि अभ्यागतांना अशा व्यक्तींना भेटून देऊ नये.
- घरातील विलगीकरण कक्षामध्ये ठेवलेल्या व्यक्तींना जर कोविड-१९ बाबत लक्षणे आढळून आली तर त्याच्या निकट संपर्कात आलेल्या सर्व व्यक्तींना १४ दिवस घरातील विलगीकरण कक्षात ठेवावे व् पुढील १४ दिवस किंवा अशा व्यक्तीचा प्रयोगशाळा रिपोर्ट निगेटीव्ह येईपर्यंत त्याचा पाठपुरावा करावा.

## घराच्या स्तरावरील विलगीकरण कक्षाची स्वच्छता

- घरात केलेल्या विलगीकरण कक्षातील असलेल्या व्यक्तीच्या खोलीमधील वारंवार हाताळल्या जाणाऱ्या वस्तुंचे [फर्निचर, बेड फ्रेम, टेबल] १ टक्के सोडीयम हायपोक्लोराईट द्रावणाने निर्जंतुकीकरण करावे.
- शौचालयाची स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण घरगुती ब्लिच किंवा घरगुती फिनायलने करावे.
- अशा व्यक्तींचे संपर्कात आलेली कपडे, अंथरूण पांघरूण हे घरातील डिटर्जंट वापरून वेगळे स्वच्छ धुवून वाळवावे.

उपरोक्त सूचनांचे तंतोतंत पालन करणेत यावे अन्यथा नियमानुसार कारवाई करुन संस्थात्मक विलगीकरण कक्षात स्थलांतरीत करणेत येईल, याची गांभीयपूर्वक नोंद घ्यावी.

(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

प्रति,

१. संभाव्य रूग्ण
२. रूग्णाचे कुटूंबिय/पालक
३. पर्यवेक्षकीय अधिकारी/कर्मचारी

प्रत :- १. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
३. आयुक्त, महानगरपालिका - पुणे / पिंपरी चिंचवड यांना माहितीस्तव.
४.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.पुणे यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी.
५. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रूग्णालय, पुणे यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी.
६. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी.